आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता

२५ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी समर्पणाच्या भावनेची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधे प्रतिपादन
- भारताला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्यात महिलांचा मोठा वाटा असल्याचे प्रधानमंत्र्यांचे प्रशंसोद्गार/ जळगावमधल्या कार्यक्रमात देशभरातल्या ११ लाख नव्या लखपती दीदींचा प्रमाणपत्र देऊन केला गौरव
- महाराष्ट्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना मार्च २०२४ पासून सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- इस्रायलवर हिजबुल्लाह संघटनेकडून क्षेपणास्त्रांचा हल्ला, शंभर लढाऊ विमानांच्या साहाय्यानं प्रत्युत्तर दिल्याचा इस्रायलचा दावा

  **आणि**

- आशियाई कनिष्ठ गट बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या तन्वी पात्रीनं पटकावलं १५ वर्षांखालच्या मुलींच्या एकेरीचं विजेतेपद

**<><><><><>**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राजकीय पार्श्वभूमी नसतानाही अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिलं, विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी आज अशाच भावनेची गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११३वा भाग होता.

आज  मोठ्या संख्येनं युवा राजकारणात यायला तयार आहेत, त्यांना केवळ योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधीची गरज आहे असं त्यांनी सांगितलं. युवकांनी या

अभियानात स्वतःला जोडून घ्यावं, असं आवाहन करतानाच, युवकांचं हे पाऊल देशाचं भविष्य बदलून टाकणारं ठरेल असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री- युवा राजकारण**

यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राबवलं गेलेलं हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या निमित्तानं देशभरात अभिनव पद्धतीनं काढलेल्या तिरंगा यात्रांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. जेव्हा लोक एकत्र येऊन आपल्या भावना प्रकट करतात तेव्हा अशा प्रकारची अभियानं प्रचंड यशस्वी होतात असं ते म्हणाले. या अभियानानं संपूर्ण देशाला एका सूत्रानं बांधलं असल्याचं ते म्हणाले.

आजच्या मन की बात मधून प्रधानमंत्र्यांनी प्राणी तसंच पर्यावरण संवर्धन आणि रक्षणासाठी देशाभरात सुरु असलेल्या काही अभिनव प्रयत्नांची, आणि अशा प्रयत्नांत योगदान देत असलेल्या तंत्रज्ञानाधारीत स्टार्ट अप्सची उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली. या क्षेत्रात अधिकाधिक स्टार्ट अप्स येऊ लागले तर त्यामुळे पशुपक्ष्यांच्या संरक्षणासोबतच, परंपराही टिकून राहतील, असं ते म्हणाले. आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर पर्यावरणाचं रक्षण होईल आणि देशही पुढे जाईल, असं ते म्हणाले.

मुलांचं पोषण ही देशाची प्राथमिकता असल्यानं मुलांना योग्य पोषण आहार मिळावा म्हणून सरकार राबवत असलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. प्रत्येकानं आपल्या क्षेत्रातल्या पोषणविषयक जागरूकता अभियानांशी जोडून घेण्याचं आवाहन त्यांनी केलं.

नुकताच २३ ऑगस्टला देशानं पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा केल्याचं सांगताना, त्यांनी मागच्या वर्षी याच दिवशी भारताचं चांद्रयान तीन चंद्राच्या दक्षिण भागात शिव - शक्ती पॉइंट इथं यशस्वीपणं उतरल्याच्या कामगिरीला उजाळा दिला.

यानिमित्तानं त्यांनी अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या गॅलेक्स आय या स्टार्ट अपच्या चमूशीही संवाद साधला.

एक पेड मां के नाम या अभियानाची आठवण करून देत, प्रत्येकानं जास्तीत जास्त झाडं लावण्याचं - त्यासाठी इतरांना प्रोत्साहन देण्याचं, आवाहनही त्यांनी आजच्या मन की बात मधून केलं.

**<><><><><>**

देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याच्या वाटचालीत महिलांचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जळगावमध्ये आज झालेल्या लखपती दिदी संमेलनात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज देशभरातल्या ११ लाख नव्या लखपती दीदींना, प्रतिकात्मक स्वरुपात प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला गेला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षांत १ कोटी लखपती दीदी झाल्या आहेत, तर गेल्या दोन महिन्यात त्यात आणखी ११ लाख लखपती दीदींची भर पडल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनविस आणि अजीत पवीर तसंच इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

नेपाळ दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली.

या संमेलनापूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी देशातल्या निवडक ८० लखपती दिदींशी संवाद साधला आणि योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाविषयी त्यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन

योजना लागू करायला राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक झाली. मार्च २०२४ पासूनच याची अंमलबजावणी होणार असून लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा मिळेल.

शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. नार - पार - गिरणा नदी जोड प्रकल्पाल तसंच खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान पर्यायी बोगदा काढायलाही मंजुरी मिळाली.

आरोग्य खात्यातल्या गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची वाढ करायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना तसंच परदेशस्थ भारतीयांना श्रीकृष्ण जयंती अर्थात कृष्णाष्टमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान श्रीकृष्णांच्या दैवी आदर्शांची आठवण करुन देणारा हा सण सर्वांना कायम प्रेरणा देत राहील असं मुर्मू यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती  जगदीप धनखड यांनी कृष्णाष्टमीच्या शुभेच्छा देताना म्हटलं आहे की हा दिवस आपल्याला चांगल्याचा वाईटावर विजय आणि इतर उच्च जीवनमूल्यांचं स्मरण करुन देतो.

**<><><><><>**

हिजबुल्लाह या लेबनॉनमधल्या दहशतवादी संघटनेनं आज सकाळी इस्रायलवर हल्ला सुरू केला. त्यांचा लष्करी नेता फौद शुकुर याच्या हत्येचा बदला घेण्यासाठी हा हल्ला असल्याचं हिजबुल्लाहनं म्हटलं आहे. ३० जुलै रोजी बैरुत इथं शुकुर याची हत्या झाली होती. हिजबुल्लाहनं इस्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला आहे.

दरम्यान, हिजबुल्लाहनं हल्ला करण्याआधीच आपण शंभर लढाऊ विमानांच्या सहाय्यानं हल्ला केल्याचं इस्रायली लष्करानं म्हटलं आहे. हिजबुल्लाहनं इस्रायलवर मोठ्या हल्ल्याची योजना आखल्याचं लक्षात आल्यामुळे हा हल्ला केल्याचं इस्रायली

लष्करानं म्हटलं आहे. इस्रायलनं केलेल्या हल्ल्यात हिजबुल्लाहची हजारो क्षेपणास्त्रं नष्ट केल्याचं राष्ट्राध्यक्ष बेंजामीन नेत्यान्याहू यांनी सांगितलं. इस्रायल आणि गाझा मध्ये युद्धविरामाची चर्चा सुरू असतानाच हा संघर्ष सुरू झाला आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये चेंगडू इथं सुरू असलेल्या आशिया १७ आणि १५ खालील कनिष्ठ गट बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या तन्वी पात्रीनं १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. तन्वीने अंतिम लढतीत व्हिएतनामच्या गुयेन थि थू ह्युगेनचा २२-२०, २१-११ असा पराभव केला.

१७ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत, ग्यान दत्तूला मात्र कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं. इंडोनेशियाच्या रादिथ्या बायु वारदानाकडून त्याला ९-२१, २१-१३, २१-१३ असा पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

न्याय प्रक्रीया क्लिष्ट असून ती सोपी आणि स्पष्ट करणं ही सर्वांची एकत्रित जबाबदारी आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. जयपूरमध्ये राजस्थान उच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते.

न्यायप्रक्रिया सुलभ करण्यासाठी सरकारनं अनेक पावलं उचलली असून अनेक कालबाह्य कायदे सरकारनं रद्द केले आहेत. नुकतेच नवे फौजदारी कायदे लागू केल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. देशातल्या १८ हजार न्यायालयात ई-कोर्ट प्रणाली सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी राज्यपाल हरीभाऊ बागडे, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

नासाचे अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि बॅरी विलमोर येत्या फेब्रुवारी महिन्यात, पृथ्वीवर परततील. हे दोघं मुळात ८ दिवसांच्या मोहिमेवर गेले होते. मात्र त्यांच्या अंतराळयानात उद्भवलेल्या अनपेक्षित समस्येमुळे त्यांना जवळजवळ ८ महिने अंतराळात घालवावे लागत आहेत. त्यांना परत आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे आता खास क्रू ड्रॅगॉन अंतराळ यान पाठवलं जाणार आहे. हे अंतराळ यान अत्याधुनिक जीवनरक्षक प्रणाली आणि परतीच्या प्रवासात अंतराळवीरांच्या सुरक्षेची खात्री देण्यासाठी अतिरिक्त सुविधांनी सज्ज असेल. ही मोहिम यशस्वी होईल, असा विश्वास नासाचे प्रशासक बिल नेलसन यांनी व्यक्त केला आहे. या मोहिमेचं सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर केलं जाईल.

**<><><><><>**

त्रिपुरामध्ये पूरग्रस्त भागात एनडीआरएफचे जवान बचावकार्य करत आहेत. पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या दक्षिण त्रिपुरा आणि सेपाहिजाला जिल्ह्यांमध्ये अजूनही बचावकार्य सुरु आहे. भूप्रदेशाची माहिती नसल्यामुळे, अडकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याचं आव्हान एनडीआरएफ समोर आहे. गोमती आणि रुद्रसागर तलावाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यानं सेपाहिजाला जिल्ह्यातल्या बटाली आणि घारांतली गावात लोकांच्या घरात पाणी शिरलं आहे.